# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

गणेशखिंड, पुणे-४११००७, भारत.

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

Ganeshkhind, Pune-411007, India.

प्रा. नितीन र. करमळकर
कुलगुरू

*Prof. Nitin R. Karmalkar*
Vice Chancellor

दूरध्वनी : (कार्यालय) ०२०-२५६९३८६८
Telephone : 020-25693868
Fax : 020-25693233
E-mail : puvc@unipune.ac.in


संदर्भ क्र. व्हीसी/९४

दिनांक : ०८/०२/२०१९

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

महोदय/महोदया,

विद्यापीठाच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दि. ११ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत माजी विद्यार्थी मेळाव्याचे भव्य आयोजन करीत आहे. माजी विद्यार्थी हा महाविद्यालये, परिसंस्था व एकूणच शैक्षणिक पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. या अतिशय महत्वाच्या घटकाचे उत्तरदायित्वसुध्दा एकूणच शैक्षणिक पर्यावरणासाठी महाविद्यालये व परिसंस्थासाठी व पर्यायाने विद्यापीठासाठी खूपच महत्त्वाचे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची ७० वर्षाची देदीप्यमान परंपरा आणि दरवर्षी लाखोंच्या संख्येने माजी विद्यार्थ्यांमध्ये पडत गेलेली भर पाहता माजी विद्यार्थ्यांचे मोठे पाठबळ विद्यापीठाच्या पाठीशी आहे, याची सतत जाणीव विद्यापीठाने अंतस्थपणे बाळगली आहे. परंतु यावर्षी हया बहुसंख्याक असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या समुदायाचे संरचनात्मक आरेखन करण्याची वेळ आली आहे. आणि हीच संधी साधून आम्ही दि. ११ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ११ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांना एकत्रित येण्याचे आवाहन करीत आहोत. याचाच एक भाग म्हणून विविध महाविद्यालये व परिसंस्थांना आवाहन करीत आहोत की आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेत कार्यान्वित असलेल्या **माजी विद्यार्थी कक्षाच्या दोन सदस्यांना आपण दि. ११ फेब्रुवारी २०१९ रोजी, सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्यास** अनिवार्यपणे उपस्थित राहण्यास निर्देशित करावे, असेही आवाहन करीत आहे.

कळावे,

आपला,

प्रा. डॉ. नितीन करमळकर
कुलगुरू

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# माजी विद्यार्थी मेळावा

सोमवार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९

स्थळ : मुख्य सभामंडप, मुख्य इमारती मागे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७

वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी २.००

नाव नोंदणीकरिता ईमेल आयडी : reports.bsd@unipune.ac.in